
ePaper

## देशातील सर्वात श्रीमंत मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™




पान 2 वरुन...

५० वर्षांनंतर पुन्हा ‘पाटील विरुद्ध काकडे’

WWW.MAHAENEWS.COM | गुरुवार, दि. 04 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## इमारतीला आग लागून 21 जण जिवंत होरपळले..!

# मृत्यूचे अग्नितांडव!



महाईन्यूज । नवी दिल्ली

**राजधानी दिल्लीतील मालवीय नगर परिसरातील एका हॉटेल-रेस्टॉरंटला बुधवारी सकाळी भीषण आग लागून २१ जणांचा होरपळून मृत्यू झाला, तर ४० हून अधिक जण जखमी झाले. मृत आणि जखमींमध्ये काही परदेशी नागरिकांचाही समावेश असल्याची माहिती समोर आली आहे.**

मालवीय नगरमधील ‘फ्लोरेश स्टे’ या हॉटेल-रेस्टॉरंटमध्ये सकाळी ८.४८ वाजण्याच्या सुमारास आग लागली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या आठ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. बचाव पथकांनी इमारतीत अडकलेल्या ४० हून अधिक जणांची सुटका करून त्यांना रुग्णालयात दाखल केले.

प्राथमिक माहितीनुसार, संबंधित हॉटेलकडे केवळ सहा खोल्यांचे परवानाधारक बी-टू-बी लायसन्स होते. मात्र, प्रत्यक्षात इमारतीत २५ हून अधिक खोल्या असल्याचे समोर आले आहे. तसेच इमारतीतून बाहेर पडण्यासाठी एकच मार्ग उपलब्ध होता. काही लोक बेसमेंटमध्ये अडकले होते. धक्कादायक बाब म्हणजे बेसमेंटच्या बाहेरील गेटला कुलूप लावलेले असल्याचा आरोप करण्यात येत आहे. आग लागल्यानंतर जीव वाचवण्यासाठी काही जणांनी तिसऱ्या मजल्यावरून उड्या मारल्या. स्थानिक नागरिकांनी तत्काळ खाली गाद्या टाकून मदतकार्य केले. मृत आणि जखमींमध्ये आफ्रिकन देशांतील नागरिकांची संख्या अधिक असल्याचे सांगितले जात आहे. हे नागरिक जवळील मॅक्स रुग्णालयात उपचार घेत असलेल्या नातेवाईकांच्या भेटीसाठी येथे वास्तव्यास होते.

दरम्यान, आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी इमारतीबाहेरील वीजतारांमध्ये शॉर्ट सर्किट झाल्याने आग लागल्याचा प्राथमिक संशय व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेनंतर दिल्लीतील हॉटेल आणि व्यावसायिक इमारतींमधील अग्निसुरक्षा व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.



### अग्निसुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

या दुर्घटनेनंतर हॉटेल्स आणि व्यावसायिक इमारतींमधील अग्निसुरक्षा व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

### हॉटेलला ६ रूमची परवानगी, परंतु आतमध्ये २० खोल्या

आग लागलेल्या हॉटेलकडे केवळ ६ खोल्यांचे परवाना होते. मात्र, प्रत्यक्षात इमारतीत २५ हून अधिक खोल्या सुरू असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. तसेच बाहेर पडण्यासाठी एकच मार्ग उपलब्ध होता. बेसमेंटच्या गेटला कुलूप असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे सुरक्षेच्या नियमांचे गंभीर उल्लंघन झाल्याची शक्यता व्यक्त होत आहे.



### जीव वाचवण्या-साठी तिसऱ्या मजल्यावरून उड्या

आगीचा भडका वाढताच अनेक जण इमारतीत अडकले. काहींनी जीव वाचवण्यासाठी तिसऱ्या मजल्यावरून उड्या मारल्या. स्थानिक नागरिकांनी तत्परता दाखवत खाली गाद्या टाकून मदतकार्य केले. त्यामुळे काहींचे प्राण वाचल्याचे सांगितले जात आहे.



# ५० वर्षांनंतर पुन्हा 'पाटील विरुद्ध काकडे'

## दोन्ही राष्ट्रवादी गट आमनेसामने; पुणे विधान परिषद निवडणुकीत इतिहासाची पुनरावृत्ती?

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत तब्बल ५० वर्षांनंतर पुन्हा एकदा 'पाटील विरुद्ध काकडे' अशी लढत रंगणार असल्याने राजकीय वर्तुळात उत्सुकता निर्माण झाली आहे. इतिहासाची पुनरावृत्ती होणार की नवा इतिहास घडणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**




राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांनी माजी खासदार संजय काकडे यांचे पुत्र विक्रम काकडे यांना उमेदवारी दिली आहे. तर महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे शहराध्यक्ष श्रीकांत पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादी गटांचे उमेदवार आमनेसामने आले आहेत.

या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे शहराध्यक्ष व माजी आमदार सुनील टिंगरे, भाजपचे जिल्हाध्यक्ष प्रदीप कंद, तुषार कामठे आणि रणजीत जरे यांचे अपक्ष अर्ज वैध ठरले आहेत. उमेश म्हेत्रे यांचा अर्ज छाननीत बाद झाला आहे. अर्ज मागे घेण्याची मुदत ४ जून रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत असून त्यानंतर अंतिम लढतीचे चित्र स्पष्ट होणार आहे.

दरम्यान, १९७७-७८ मधील याच मतदारसंघातील निवडणुकीत श्रीकांत पाटील यांचे वडील वि. भा. पाटील हे काँग्रेसचे उमेदवार होते. त्यांच्याविरोधात दिवंगत खासदार संभाजीराव काकडे मैदानात होते. त्या वेळी शरद पवार यांनी वि. भा. पाटील यांना पाठिंबा दिला होता आणि पाटील यांनी विजय मिळवला होता. आता पुन्हा एकदा पवार यांच्या नेतृत्वाखाली श्रीकांत पाटील निवडणूक रिंगणात उतरले असून त्यांच्यासमोर विक्रम काकडे यांचे आव्हान आहे.

यंदाच्या निवडणुकीत भाजपचे जिल्हाध्यक्ष प्रदीप कंद यांच्या भूमिकेकडेही विशेष लक्ष लागले आहे. कंद यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला असून त्यांची माघार व्हावी यासाठी प्रयत्न सुरू असल्याची चर्चा आहे. जिल्हा परिषद अध्यक्षपदाचा अनुभव आणि ग्रामीण भागातील जनसंपर्क लक्षात घेता त्यांनी निवडणूक लढविल्यास मतविभाजन होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे अंतिम टप्प्यात प्रदीप कंद कोणती भूमिका घेतात, यावर निवडणुकीचे गणित अवलंबून राहणार आहे. पाच दशकांनंतर पुन्हा रंगणाऱ्या 'पाटील विरुद्ध काकडे' या राजकीय संघर्षामुळे पुणे जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील निवडणूक चांगलीच चर्चेत आली आहे. निकालानंतर इतिहासाची पुनरावृत्ती होते की नवीन अध्याय लिहिला जातो, हे स्पष्ट होणार आहे.

### ५० वर्षांपूर्वीची ऐतिहासिक लढत

१९७७-७८ मध्ये पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात काँग्रेसचे उमेदवार वि. भा. पाटील आणि दिवंगत खासदार संभाजीराव काकडे यांच्यात चुरशीची निवडणूक झाली होती. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी वि. भा. पाटील यांना पाठिंबा दिला होता. या लढतीत पाटील यांनी विजय मिळवत काकडे यांचा पराभव केला. आता तब्बल ५० वर्षांनंतर त्याच मतदारसंघात पुन्हा 'पाटील विरुद्ध काकडे' अशी लढत रंगणार असल्याने त्या ऐतिहासिक निवडणुकीच्या आठवणी पुन्हा ताज्या झाल्या आहेत.



### प्रदीप कंद यांच्या माघारीसाठी प्रयत्न

भाजपचे जिल्हाध्यक्ष प्रदीप कंद हे उमेदवारीसाठी इच्छुक होते. त्यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.आता कंद यांनी उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी काकडे यांच्याकडून प्रयत्न सुरू करण्यात येत आहेत. कंद हे पुणे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष असून, त्यांचा जिल्ह्याच्या ग्रामीण भागात जनसंपर्क आहे. त्यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला नाही, तर मतविभाजनाचा फटका काकडे यांना बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे कंद यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

# धानोरेतील बेकायदेशीर स्क्रॅप गोडाऊनला भीषण आग

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील धानोरे गावात मंगळवारी दुपारी एका बेकायदेशीर स्क्रॅप गोडाऊनला भीषण आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. आगीचे स्वरूप इतके गंभीर होते की, सुमारे पाच किलोमीटरपर्यंत काळ्या धुराचे लोट आकाशात पसरले होते. या घटनेमुळे परिसरातील नागरिक आणि उद्योग क्षेत्रात भीतीचे वातावरण निर्माण झाले.**



मिळालेल्या माहितीनुसार, धानोरे येथील गट क्रमांक ३९२ मधील जागेत 'गायत्री स्टील अँड मेटल' नावाचे स्क्रॅप गोडाऊन कार्यरत आहे. दुपारी सुमारे सव्वाचारच्या सुमारास गोदामात साठवून ठेवलेल्या प्लास्टिक तसेच इतर ज्वलनशील वस्तूंना अचानक आग लागली. काही मिनिटांतच आगीने रौद्ररूप धारण करत संपूर्ण गोदामाला वेढा घातला.

घटनेची माहिती मिळताच आळंदी नगरपरिषदेच्या अग्निशामक दलासह विविध विभागांच्या एकूण सहा अग्निशमन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. गोदामात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक आणि रासायनिक घटक असलेला मेडिकल वेस्ट साठवण्यात आल्याने आग झपाट्याने पसरत होती. त्यामुळे आग नियंत्रणात आणण्यासाठी अग्निशमन दलाला मोठी कसरत करावी लागली.

सुमारे साडेतीन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर अग्निशामक दलाने आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र या आगीत संपूर्ण स्क्रॅप गोडाऊन जळून खाक झाले. तसेच एक आयशर मालवाहू वाहन आणि एक कार पूर्णपणे जळून नष्ट झाली. आगीदरम्यान तीन गॅस सिलिंडरचा स्फोट झाल्याची नोंद असून त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण अधिकच तीव्र झाले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र धुरामुळे परिसरातील अनेक नागरिकांना श्वसनाचा त्रास जाणवल्याची माहिती समोर आली आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने आळंदी पोलिसांनी घटनास्थळी बंदोबस्त तैनात करून वाहतूक नियंत्रणाची जबाबदारी सांभाळली. प्राथमिक माहितीनुसार, शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. दरम्यान, निवासी आणि औद्योगिक भागांमध्ये सुरू असलेल्या बेकायदेशीर स्क्रॅप गोडाऊनचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. अशा धोकादायक व्यवसायांवर प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

### बेकायदेशीर गोडाऊनांवर प्रश्नचिन्ह

धानोरे येथील भीषण आगीच्या घटनेनंतर निवासी व औद्योगिक भागांमध्ये सुरू असलेल्या बेकायदेशीर स्क्रॅप गोडाऊनचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. स्क्रॅपसह प्लास्टिक, रासायनिक पदार्थ आणि मेडिकल वेस्टचा साठा असल्याने अशा ठिकाणी आगीचा धोका कायम असतो. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अशा बेकायदेशीर व्यवसायांची तपासणी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे.

# भामा-आसखेड जलवाहिनी प्रकल्प पुन्हा रखडला

## देहूगाव येथील नदीपात्रातील कामावर पावसाचे सावट; मुदतीत प्रकल्प पूर्ण होणार का यावर प्रश्नचिन्ह

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने शहरातील नागरिकांची तहान भागविण्यासाठी भामा आसखेड धरणातून पाणी आणण्यात येणार आहे. त्यासाठी मागील काही वर्षांपासून बंद जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू आहे. परंतु, अद्याप ते काम पूर्ण झाले नाही. यामुळे शहरवासीयांना पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ आली आहे. हे काम करण्यासाठी वारंवार मुदतवाढ देण्यात येत आहे. परंतु, अजूनही यंदा काम पूर्ण होईल की नाही, याबाबत शाशंकता आहे.**

तीर्थक्षेत्र देहू येथील इंद्रायणी नदीपात्रात पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू आहे. परंतु, सध्या मान्सूनजवळ येत असल्याने पावसाळ्यात दुधडी भरून वाहणारी इंद्रायणीत काम करणे शक्य होणार आहे का, असा प्रश्न नागरिक करत आहेत.

जे काम केले आहे तेदेखील पाण्यात वाहून जात की काय, अशी भीती व्यक्त होत आहे. सध्या या कामावर पावसाचे सावट दाटू लागले असून, पावसाळा तोंडावर असताना कामाची गती आणि पूर्णत्वाबाबत नागरिकांमध्ये तीव साशंकता निर्माण झाली आहे.

नदीतील पाण्याच्या पातळीपासून तब्बल 25 फूट खाली मातीचा भराव टाकून पाणी अडविणे व भूमिगत पाईपलाईन टाकण्याचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे.



### मागील वर्षाची पुनरावृत्ती होणार का?

देहूगाव येथे इंद्रायणी नदीत सुमारे 110 मीटर लांबीच्या पात्रात गेल्या दहा-बारा दिवसांपासून मातीचा भराव टाकण्याचे काम सुरू आहे. मात्र, जून महिन्याच्या प्रारंभीच पावसाची चाहूल लागल्याने हे काम वेळेत पूर्ण होणार का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. गतवर्षी याच ठिकाणी सुरू असलेले काम पावसामुळे विस्कळीत झाले होते. नदीपात्रातील मातीचा भराव पाण्याच्या प्रवाहात वाहून गेल्याने कामाची गती मंदावली होती. यंदाही तशीच परिस्थिती निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे.

### 10 जूनपर्यंत काम पूर्ण करण्याचा मानस

हे काम 20 मेपासून सुरू करण्यात आले आहे. तर 10 जूनपर्यंत काम पूर्ण करण्यात येईल, अशी ग्वाही व्ही. एम. जावळे कन्स्ट्रक्शनचे संचालक व्ही. एम. जावळे यांनी दिली आहे. मात्र, पुढील काही दिवसांत पावसाचा जोर वाढल्यास कामाच्या मुदतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या कामाकडे नागरिकांचे लक्ष लागून आहे.

### या कामासाठी पुन्हा नव्याने ठेका

भामा-आसखेड धरणातून पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी महापालिकेच्या वतीने हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येत आहे. मात्र, दीर्घकाळ रखडलेल्या या कामाला वारंवार मुदतवाढ देऊनही अपेक्षित गती मिळाली नाही. पूर्वीच्या ठेकेदाराकडून काम पूर्ण न झाल्याने उर्वरित सुमारे 30 टक्के कामासाठी नव्याने ठेका देण्यात आला. 10 एप्रिल रोजी कार्यदेश देण्यात आला असून, नऊ महिन्यांत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

# पिंपरीतील सरकारी जागेवरील कथित एसआरए घोटाळा उघड

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (पीडब्लूडी) मालकीच्या जागेवर प्रत्यक्षात झोपडपट्टी अस्तित्वात नसतानाही चक्क झोपडपट्टी असल्याचे दाखवून झोपडपट्टी पुनर्वसनाची योजना (एसआरए) राबविण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उजेडात आला आहे. या प्रकारामुळे सरकारी जागेवर डल्ला मारत एसआरएच्या माध्यमातून कोट्यवधींच्या टीडीआरची लूट करण्यात आल्याचा आरोप होत आहे. एसआरएचे अधिकारी आणि बिल्डर यांच्या संगनमतातून हा घोटाळा करण्यात आल्याची चर्चा आहे.**

पिंपरी सिटी स. नं. 3923 (पी) व 4663 (पी) येथील 3 हजार 332 चौरस मीटर जागेवर पीडब्लूडीची सॅनिटरी चाळ अस्तित्वात होती. या चाळीत पीडब्लूडीचे कर्मचारी वास्तव्यास होते. तसेच याठिकाणीच पिंपरी पुलाच्या खाली भाटनगर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील 10 झोपडपट्टीधारकांचे तात्पुरत्या स्वरूपातील संक्रमण शिबिर करण्यात आले होते. असे असतानाच जुलै 2024 मध्ये 'वाकडकर पाटील असोसिएट्स एलएलपी' या विकसकाने या जागेवर 147 झोपड्या असल्याचे दाखवून त्यांच्या पुनर्वसनासाठी एसआरए योजना राबविण्याचा प्रस्ताव दाखल केला.

धक्कादायक म्हणजे एसआरएच्या सर्व यंत्रणांमधून या प्रस्तावावर कार्यवाही झाली आणि अवघ्या दोन महिन्यांत म्हणजेच 21 ऑगस्ट 2024 रोजी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश गटणे यांनी ही योजना जारी करून टाकली. यामधील धक्कादायक बाब म्हणजे ज्या जागेवर एसआरएची योजना मंजूर करण्यात आली. त्याठिकाणी अगदी पाच ते सात वर्षांपूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाची चाळ होती आणि त्यात या विभागाचे कर्मचारी राहत होते. असे असताना भाटनगर एसआरएच्या संक्रमण शिबिरातील दहा झोपडपट्टीधारक अन्य इतरत्रचे झोपडपट्टी व बोगस लाभार्थी दाखवून एसआरए मंजूर करण्यात आली.

### झोपडपट्टीसदृश्य असल्याचे भासवून योजना

सॅनिटरी चाळीच्या जागेवर घोषित झोपडपट्टी नाही. मात्र, एसआरएच्या कार्यालयातील उपजिल्हाधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष स्थळपाहणीत येथे झोपडपट्टीसदृश्य परिस्थिती असल्याचा अहवाल 1 नोव्हेंबर 2023 रोजी दिला, त्यानुसार याठिकाणी एसआरए योजनेचा घाट घातला आहे.




### सीईओ नीलेश गटणे यांच्या कार्यकाळातच घोटाळा

पिंपरीतील मिलिंदनगर, विठ्ठलनगर-नेहरूनगर पाठोपाठ आता सॅनिटरी चाळच्या एसआर योजनेतील घोटाळा उघड झाला आहे. यामधील धक्कादायक बाब म्हणजे मिलिंदनगरपासून सॅनिटरी चाळ एसआरए योजनेपर्यंतच्या सर्व योजना तत्कालीन सीईओ नीलेश गटणे यांच्या काळातच मंजूर झाल्या आहेत. या सर्व योजनांमध्ये प्रचंड अनियमितता झाली असून, गटने यांचाच आशीर्वाद त्यांना लाभला असल्याचे स्पष्ट होत आहे.

### झोपडपट्टी असल्याचे पुरावेच नाहीत

पिंपरी सॅनिटरी चाळीच्या ज्या जागेवर एसआरएची योजना राबवली, तिथे झोपडपट्टी असल्याचा पुरावाच नसल्याचे समोर आले आहे. याबाबत 'मशाल' संस्थेने केलेल्या सर्व्हेमध्येही ही जागा रिकामी दाखविण्यात आली आहे. पूर्वी इथे पीडब्लूडीची चाळ जागेवर अस्तित्वात होती. असे असतानाही या जागेवर एसआरए योजना कशाच्या आधारे मंजूर केली, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. दहा-पंधरा वर्षांतील गुगल इमेज तपासले, तरी इथे झोपडपट्टी नव्हतीच हेच समोर येणार आहे.



## भूमिका

**देशातील शिक्षण व्यवस्थेवरील विश्वासाला पुन्हा एकदा मोठा धक्का बसला आहे. 'नीट' परीक्षेतील प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणानंतर फेरपरीक्षा घेण्याचा निर्णय झाला असला, तरी त्यासाठी भारतीय हवाई दलाच्या विमानांद्वारे प्रश्नपत्रिका पोहोचविण्याची घोषणा नव्या वादाला कारणीभूत ठरली आहे.**

# हवाई दलाने सीमा सांभाळायच्या की 'नीट'चे पेपर?




विद्यार्थ्यांचा विश्वास पुनर्स्थापित करण्याचा सरकारचा हेतू असला, तरी या निर्णयाने राष्ट्रीय परीक्षा व्यवस्थेतील गंभीर त्रुटीच अधोरेखित केल्या आहेत.

भारतीय हवाई दलाचे प्रमुख काम देशाच्या सीमांचे संरक्षण करणे हे आहे. अशा दलाची मदत प्रश्नपत्रिका वाहतुकीसाठी घ्यावी लागते, याचा अर्थ संबंधित नागरी यंत्रणा आपली जबाबदारी प्रभावीपणे पार पाडण्यात अपयशी ठरल्या आहेत.

प्रश्नपत्रिका सुरक्षित ठेवण्याची आणि त्या नियोजित केंद्रांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी परीक्षा घेणाऱ्या संस्थांची असते. त्यासाठी संरक्षण दलांची मदत घ्यावी लागणे हे प्रशासनातील कमकुवतपणाचे लक्षण मानले जाईल. राष्ट्रीय परीक्षा संस्था (एनटीए) गेल्या काही वर्षांत सातत्याने वादात राहिली आहे.

'नीट', 'जेईई'सह विविध परीक्षांमध्ये पारदर्शकतेबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित असलेल्या या परीक्षांमध्ये झालेल्या चुका केवळ तांत्रिक त्रुटी म्हणून दुर्लक्षित करता येणार नाहीत. प्रत्येक वेळी चौकशी, समित्या आणि आश्वासने दिली जातात; मात्र मूलभूत सुधारणा मात्र अपेक्षित वेगाने होताना दिसत नाहीत.

या पार्श्वभूमीवर शिक्षण मंत्रालयाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. गेल्या दशकात विविध शिक्षणमंत्र्यांच्या कार्यकाळात अनेक वाद निर्माण झाले. राष्ट्रीय शिक्षण धोरणापासून परीक्षा व्यवस्थापनापर्यंत अनेक निर्णय चर्चेच्या केंद्रस्थानी राहिले.

शिक्षण क्षेत्रात विश्वासार्हता निर्माण करण्यासाठी केवळ घोषणा पुरेशा नसतात; त्यासाठी मजबूत संस्था, सक्षम यंत्रणा आणि स्पष्ट उत्तरदायित्व आवश्यक असते. दरम्यान, केंद्र सरकार एका बाजूला भारत-अमेरिका संबंध अधिक दृढ करण्यासाठी प्रयत्नशील आहे, तर दुसऱ्या बाजूला दिल्लीतील प्रतिष्ठित क्लबांच्या जमिनींबाबत कठोर भूमिका घेत आहे. या घडामोडी सरकारच्या व्यापक प्रशासकीय आणि राजकीय दृष्टिकोनाचे दर्शन घडवतात.

मात्र, देशातील सामान्य नागरिकांसाठी आणि विशेषतः विद्यार्थ्यांसाठी सर्वात महत्त्वाचा मुद्दा हा शिक्षण व्यवस्थेवरील विश्वासाचाच आहे.सरकारने फेरपरीक्षा यशस्वीपणे पार पाडणे महत्त्वाचे आहेच; पण त्याहून अधिक महत्त्वाचे म्हणजे अशा घटना पुन्हा घडणार नाहीत, याची खात्री निर्माण करणे.

अन्यथा प्रत्येक परीक्षेनंतर निर्माण होणारे प्रश्न, संशय आणि वाद विद्यार्थ्यांच्या भविष्यावरच परिणाम करत राहतील. शिक्षण क्षेत्रात विश्वास गमावणे ही कोणत्याही देशासाठी परवडणारी बाब नाही. त्यामुळे तात्पुरत्या उपायांपेक्षा दीर्घकालीन आणि परिणामकारक सुधारणांची गरज आज अधिक तीव्रतेने जाणवत आहे.

## प्रासंगिक »

### अहंकारी राजाला धडा

**एका राज्याचा राजा अत्यंत अहंकारी होता. त्याला आपल्या संपत्तीचा, शक्तीचा, सौंदर्याचा आणि बुद्धीचा मोठा गर्व होता. तो नेहमी इतरांचा अपमान करत असे.**

त्यामुळे प्रजा त्याच्यावर नाराज होती. एके दिवशी एक विद्वान पंडित राजाच्या दरबारात आला. राजाने गर्वाने त्याला विचारले, "तुम्हाला काय हवे ते मागा. धन, जमीन, सोने, धान्य काहीही देईन." हे ऐकताच पंडित हसू लागला. राजाला आश्चर्य वाटले. पंडित म्हणाला, "महाराज, तुमच्याकडे मला देण्यासारखे काहीच नाही." राजा संतापला. तेव्हा पंडित शांतपणे म्हणाला, "तुमचा जन्म तुमच्या इच्छेने झाला नाही. रूप, सौंदर्य आणि पराक्रम हे आई-वडील व ईश्वराची देणगी आहे. धान्य धरतीमातेचे आहे, तर खजिना प्रजेच्या करातून भरलेला आहे. राज्यही तुम्हाला पूर्वजांकडून मिळाले आहे. मग यातील खरे तुमचे काय?" पंडिताचे शब्द राजाच्या मनाला भिडले. त्याला आपल्या अहंकाराची जाणीव झाली. त्या दिवसापासून त्याने गर्व सोडून नम्रतेचा मार्ग स्वीकारला.

**- तात्पर्य : जे आपले नाही, त्याचा गर्व बाळगणे व्यर्थ असते; नम्रताच माणसाचे खरे वैभव असते.**

निश्चलनीकरणाच्या निर्णयाला यंदा दहा वर्षे पूर्ण होत आहेत. ८ नोव्हेंबर २०१६ रोजी केंद्र सरकारने ५०० आणि १००० रुपयांच्या नोटा चलनातून बाद करण्याचा निर्णय घेतला होता.

# रुपयाचे मूल्य नाही, मान तरी वाढेल?

काळा पैसा, बनावट नोटा आणि रोखीच्या व्यवहारांवरील अवलंबित्व कमी करणे ही त्यामागील प्रमुख उद्दिष्टे होती. त्यावेळी या निर्णयामुळे डिजिटल अर्थव्यवस्थेला चालना मिळेल आणि रोख व्यवहारांमध्ये मोठी घट होईल, असे सांगण्यात आले होते. मात्र दशकभरानंतरची परिस्थिती वेगळेच चित्र दाखवते. निश्चलनीकरणाच्या वेळी देशातील चलनातील रोख रकमेचे मूल्य सुमारे १८ लाख कोटी रुपये होते. आज हेच मूल्य जवळपास ४३ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. म्हणजेच चलनातील रोख रक्कम कमी होण्याऐवजी अडीचपट वाढली आहे. यावरून डिजिटल व्यवहार वाढले असले तरी रोखीचे महत्त्व कमी झालेले नाही, हे स्पष्ट होते.

गेल्या काही वर्षांत यूपीआयसह विविध डिजिटल पेमेंट प्रणालींचा झपाट्याने विस्तार झाला आहे. छोट्या दुकानदारांपासून ते मोठ्या व्यावसायिकांपर्यंत सर्व स्तरांवर डिजिटल व्यवहार स्वीकारले जात आहेत. तरीही रोख व्यवहारांची गरज कायम आहे.



ग्रामीण भागातील व्यवहार, लहान खरेदी-विक्री आणि सर्वसामान्यांचा रोखीवरील विश्वास यामुळे चलनी नोटांची मागणी सतत वाढताना दिसते. याच पार्श्वभूमीवर रिझर्व्ह बँकेने प्लास्टिकच्या नोटा चलनात आणण्याचा विचार पुढे केला आहे. कागदी नोटांची झीज, त्यांचे कमी आयुष्य आणि वाढता छपाई खर्च यामुळे अधिक टिकाऊ पर्यायाची गरज निर्माण झाली आहे. दरवर्षी मोठ्या प्रमाणावर खराब झालेल्या नोटा बदलण्यासाठी बँकांना खर्च करावा लागतो. त्यामुळे दीर्घकाळ टिकणाऱ्या नोटा वापरण्याचा विचार व्यावहारिक वाटतो. प्लास्टिकच्या नोटा अनेक देशांमध्ये यशस्वीपणे वापरल्या जात आहेत. त्या अधिक मजबूत असतात, पाण्याने खराब होत नाहीत आणि त्यांचे आयुष्य कागदी नोटांपेक्षा जास्त असते. तसेच त्यांचा पुनर्वापर करणेही शक्य असते. त्यामुळे खर्चात बचत होण्याबरोबरच चलन व्यवस्थापन अधिक प्रभावी होऊ शकते. या सर्व घडामोडींमधून एक गोष्ट स्पष्ट होते. तंत्रज्ञानाचा प्रसार झाला, डिजिटल व्यवहार वाढले, तरी रोखीच्या व्यवहारांची गरज संपलेली नाही. आर्थिक धोरणे आखताना वास्तवाचा विचार करणे आवश्यक असते. निश्चलनीकरणाने अनेक अपेक्षा निर्माण केल्या होत्या; मात्र रोख चलनाचा वापर कमी करण्याचे उद्दिष्ट पूर्ण झालेले दिसत नाही.

रुपयाचे आंतरराष्ट्रीय मूल्य वाढविणे हा वेगळा विषय असला तरी देशातील चलन अधिक सुरक्षित, टिकाऊ आणि दर्जेदार बनविणे ही काळाची गरज आहे. प्लास्टिकच्या नोटांमुळे अर्थव्यवस्थेत मोठा बदल घडणार नाही; परंतु भारतीय रुपयाला अधिक टिकाऊ स्वरूप मिळेल. मूल्य वाढो वा न वाढो, निदान रुपयाचा मान तरी वाढेल, अशी अपेक्षा ठेवण्यास हरकत नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आम्हां आम्ही आतां वडील धाकुटीं ।
नाहीं पाठीं पोटीं कोणी दुजें ॥१॥

फावला एकांत एकविध भाव ।
हरि आम्हांसवें सर्व भोगी॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# नागपूर जिल्ह्यातील 66 गावे पुराच्या धोक्यात

## आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार होणार; नदीलगतच्या गावांवर प्रशासनाचे लक्ष

**महाईन्यूज । नागपूर**

**जिल्ह्यातील १५७ गावे हे नदी, नाल्या लगत आहे. यातील ६६ गावांना पुराचा धोका जास्त आहे. त्यामुळे या गावांसाठी आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात येणार आहे.**



पावसाळ्यातदरवर्षी अतिवृष्टी होते. अतिवृष्टीमुळे नदी, नाल्यांना पूर परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे नदी, नाल्या लगतच्या गावातील नागरिकांचे मोठे नुकसान होते. अतिवृष्टीनंतर प्रशासनाकडून मदत कार्य करून आवश्यक सुविधाही पुरवण्यात येते. परंतु अनेकदा त्याला वेळ लागतो. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने पूर परिस्थितीचा जास्त धोका असलेल्या ६६ गावांची नोंद केली आहे.

यात सर्वाधिक १६ गावे सावनेर तालुक्यातील आहे. तर मौदा तालुक्यातील ९, पारशिवनी व उमरेडमधील ८-८,कुही व कामठी तालुक्यातील प्रत्येकी ६, हिंगणा व भिवापूरमधील ५-५, नागपूर ग्रामीण तालुक्यातील २ व कळमेश्वर तालुक्यातील एका गावाचा समावेश आहे. या गावांसाठी आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात येत आहे. या पूर आल्यास संबंधित गावातील नागरिकांना स्थलांतरित करायचे ठिकाण निश्चित करण्यात येईल. त्याच प्रमाणे औषधोपचारासाठी आवश्यक साहित्य, मनुष्यबळाची व्यवस्था करून ठेवण्यात येईल. त्यामुळे पूर परिस्थितीनंतर प्रशासनाची धावपळ उडणार नाही.

### सावनेर तालुक्यात सर्वाधिक १६ गावे धोक्यात

नागपूर जिल्ह्यात पूराचा सर्वाधिक धोका सावनेर तालुक्यातील १६ गावांना आहे. त्यापाठोपाठ मौदा तालुक्यातील ९, पारशिवनी व उमरेडमधील प्रत्येकी ८, कुही व कामठीमधील प्रत्येकी ६, हिंगणा व भिवापूरमधील प्रत्येकी ५ गावे पूरप्रवण म्हणून ओळखण्यात आली आहेत. या गावांसाठी स्थलांतर, औषधोपचार आणि आपत्कालीन यंत्रणांचा स्वतंत्र आराखडा तयार करण्यात येणार आहे.

### पूर आला तर नागरिकांना कुठे हलवणार?

पूरस्थिती निर्माण झाल्यास नागरिकांचे तातडीने सुरक्षितस्थळी स्थलांतर करता यावे यासाठी प्रशासनाकडून आगाऊ नियोजन करण्यात येत आहे. प्रत्येक पूरप्रवण गावासाठी निवारा केंद्रे निश्चित केली जाणार असून आवश्यक औषधे, अन्नधान्य आणि मनुष्यबळाची व्यवस्था उपलब्ध ठेवली जाणार आहे. त्यामुळे आपत्तीच्या काळात मदतकार्य अधिक वेगाने आणि प्रभावीपणे करता येणार आहे.



# पात्र लाडक्या बहिणींच्या अर्जांची पुन्हा पडताळणी

**महाईन्यूज । मुंबई**

ख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभ स्थगित झालेल्या पात्र महिलांच्या अर्जांची पुन्हा पडताळणी केली जाणार असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी दिली.

योजनेतील अपात्र ठरलेल्या ८१ लाख महिलांपैकी सुमारे ६२ लाख महिलांनी ई-केवायसी केलेली नाही. शासनाच्या निकषांबाबत गैरसमज असल्याने अनेक महिलांनी ही प्रक्रिया पूर्ण केली नसल्याचे निदर्शनास आले आहे.


ज्या महिलांनी ई-केवायसी पूर्ण केली आहे, वाहन नोंदणी नसतानाही त्यांचा लाभ स्थगित झाला आहे किंवा इतर कारणांमुळे लाभ बंद झाला आहे, त्यांनी महिला व बालविकास विभागाशी संपर्क साधावा. अशा सर्व प्रकरणांची फेरतपासणी करून पात्र लाभार्थ्यांना न्याय दिला जाईल, असे तटकरे यांनी स्पष्ट केले.

# आनंदवार्ता! पुढील २४ तासांत मान्सून केरळमध्ये धडकणार! ; 'या' राज्यांना मुसळधार पावसाचा इशारा

**महाईन्यूज । मुंबई**

**आजपासून मान्सूनचा प्रवास पुन्हा एकदा सुरू झाला असून पुढील २४ तासांत मान्सून केरळमध्ये दाखल होऊ शकतो. याबाबत आज हवामान विभागाने नवीन अपडेट दिली आहे. तसेच काही राज्यात मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे.**






शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी आनंदाची बातमी आहे. येत्या २४ तासांमध्ये नैऋत्य मोसमी पाऊस केरळमध्ये दाखल होण्यासाठी अत्यंत अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे.

भारतीय हवामान विभागाने ३ जून २०२६ रोजी जारी केलेल्या विशेष बुलेटिननुसार, मान्सूनची उत्तर सीमा सध्या अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरातील अनेक भागांना व्यापून पुढे सरकत आहे.

पुढील २४ तासांत मान्सून लक्षद्वीप, केरळ आणि तामिळनाडूच्या आणखी काही भागांत प्रवेश करेल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. केरळमध्ये मान्सूनच्या आगमनासोबतच पुढील ६ ते ७ दिवसांत काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. याशिवाय दक्षिण भारतामधील तामिळनाडू आणि कर्नाटक राज्यांतही काही ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, उत्तर-पश्चिम, मध्य आणि पूर्व भारतासह दक्षिण द्विकल्पीय भारतात या आठवड्यात अनेक ठिकाणी ४० ते ५० किमी प्रतितास वेगाने वाहणारे वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह मध्यम ते तीव्र स्वरूपाचा पाऊस पडू शकतो.

कोंकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्र- ३ ते ७ जून दरम्यान या भागात विजांच्या कडकडाटासह आणि ४०-५० किमी प्रतितास वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यासह हलका ते मध्यम पाऊस पडेल. कोंकण आणि गोव्यात ३ ते ५ जून आणि पुन्हा ८-९ जून दरम्यान, तर मध्य महाराष्ट्रात ५ जून रोजी काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. मराठवाडा आणि विदर्भ- मराठवाड्यात ३ ते ६ जून दरम्यान, तर विदर्भात ४ जून रोजी वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरामध्ये निर्माण झालेल्या चक्राकार हवामान स्थितीमुळे समुद्र खवळलेला राहणार आहे. ३ ते ८ जून दरम्यान केरळ, कर्नाटक, लक्षद्वीप आणि दक्षिण महाराष्ट्र-गोव्याच्या किनारपट्टीवर ताशी ४० ते ५० किमी वेगाने वारे वाहणार असल्याने मच्छीमारांनी या काळात समुद्रात जाऊ नये, असे आवाहन हवामान विभागाने केले आहे. एकीकडे दक्षिण आणि पश्चिमे कडे पावसाचे आगमन होत असताना, पूर्व आणि उत्तर भारताला मात्र उष्णतेचा त्रास सहन करावा लागणार आहे.

# रशियाने भारताला दिलेला शब्द पाळला

## भारताला मिळाली चौथी 'एस-४०० क्षेपणास्त्र' हवाई संरक्षण प्रणाली

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारत आपली हवाई सुरक्षा यंत्रणा आणखी मजबूत करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे. या अनुषंगानेच भारताने रशियाकडून चौथी एस-४०० हवाई संरक्षण प्रणाली घेण्याचा निर्णय घेतला होता. आता ही चौथी एस-४०० हवाई संरक्षण प्रणाली भारताला मिळाली आहे.'ऑपरेशन सिंदूर'च्या दरम्यान या 'एस-४००' हवाई संरक्षण प्रणालीने अतिशय महत्त्वाची भूमिका बजावल्याचं सांगण्यात आलं होतं.**



या हवाई संरक्षण प्रणालीच्या माध्यमातून पाकिस्तानी विमाने, ड्रोन रोखण्यास मोठ्या प्रमाणात मदत झाली होती. त्यामुळे या हवाई संरक्षण प्रणालीचं कौतुक करण्यात आलं होतं. 'एस-४००' ही हवाई संरक्षण प्रणाली रशियन बनावटीची असून जगातील सर्वात प्रगत प्रणालींपैकी एक असल्याचं मानलं जातं. अनेक देशांच्या लष्करी रणनीतीचा ही हवाई संरक्षण प्रणाली महत्वाचा भाग बनलेली आहे.

भारताने पाकिस्तानच्या विरोधात राबवलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये या प्रणालीच्या अचूकतेची आणि लांब पल्ल्याच्या क्षमतेची झलक पाहायला दिसून आली होती. भारताच्या लांब पल्ल्याच्या हवाई संरक्षण क्षमतेला यामुळे मोठी चालना मिळण्यास मदत होणार आहे. रशियन बनावटीच्या 'एस-४००' सुदर्शन हवाई संरक्षण क्षेपणास्त्र प्रणालीची चौथी स्क्वाड्रन भारतात दाखल झाली आहे. आता ही हवाई संरक्षण प्रणाली लवकरच एका कार्यरत क्षेत्रात तैनात केली जाण्याची शक्यता आहे. या संदर्भातील वृत्त न्यूज १८ ने दिलं आहे.

दरम्यान, रशियाबरोबर २०१८ मध्ये झालेल्या करारानुसार पाच 'एस-४००' स्क्वाड्रनपैकी ही चौथी स्क्वाड्रन भारतात दाखल झाली आहे. याआधी तीन स्क्वाड्रन भारतीय सशस्त्र दलांमध्ये आधीच कार्यरत आहेत. प्रत्येक एस-४०० स्क्वाड्रनमध्ये कमांड-अँड-कंट्रोल युनिट्स, प्रगत रडार आणि क्षेपणास्त्र प्रक्षेपक यांचा समावेश असतो. प्रत्येक स्क्वाड्रनमध्ये प्रत्येकी सहा प्रक्षेपक असलेल्या दोन बॅटरी असून त्यांमध्ये एकूण १२८ क्षेपणास्त्रे वाहून नेण्याची क्षमता असते.

चौथ्या स्क्वाड्रनच्या आगमनामुळे भारताचं हवाई संरक्षण जाळं अधिक मजबूत झालं आहे. 'एस-४००' ही जगातील सर्वात प्रगत लांब पल्ल्याच्या जमिनीवरून हवेत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्रांच्या प्रणालींपैकी एक आहे. जी लढाऊ विमाने, निगराणी, क्रूझ क्षेपणास्त्रे आणि बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांसह विविध प्रकारच्या लक्ष्यांना शोधण्यास आणि त्यांचा मागोवा घेण्यास आणि त्यांच्यावर हल्ला करण्यास सक्षम आहे.

भारताने २०१८ मध्येच रशियाबरोबर एकूण पाच स्क्वॉड्रनसाठी एस-४०० खरेदी करारावर स्वाक्षरी केली होती. त्यानुसार, याआधी तीन स्क्वॉड्रन सुमारे दोन वर्षांपूर्वी भारताला मिळाली होती. मात्र, मध्यंतरी रशिया-युक्रेन संघर्षामुळे निर्माण झालेल्या व्यत्ययांमुळे उर्वरित वितरणास विलंब झाल्याचं सांगितलं जात होतं. मात्र, आता भारताला चौथी 'एस-४००' हवाई संरक्षण प्रणाली मिळाल्याने आता मूळ करारानुसार फक्त एका युनिटचं वितरण बाकी आहे.

### ही प्रणाली का खास आहे?

पाकिस्तान आणि पाकिस्तानव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांविरुद्ध भारताच्या लष्करी कारवाईदरम्यान, म्हणजेच 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारताने प्रथमच एस-४०० चा यशस्वीपणे वापर केला होता. भारतीय लष्कराने पाकिस्तानमधील एअरबेस, रडार केंद्र आणि कमांड-अँड-कंट्रोल सेंटर्सना लक्ष्य केलं होतं. यावेळी पाकिस्तानी लढाऊ विमाने, एअरबॉर्न अर्ली वॉर्निंग एअरक्राफ्ट आणि इलेक्ट्रॉनिक इंटेलिजन्स प्लॅटफॉर्म यांना प्रभावीपणे काम करण्यापासून रोखल्याचं श्रेय भारतीय हवाई दलाने एस-४०० प्रणालीला दिलं होतं.

### एस-४०० ही प्रणालीमुळे भारताची ताकद वाढणार?

दरम्यान, एस-४०० ही जगातील सर्वात अत्याधुनिक एअर डिफेन्स सिस्टिम आहे. शत्रूचे कुठल्याही प्रकारचे हवाई हल्ले निष्प्रभ करण्याची क्षमता या तंत्रज्ञानामध्ये आहे. युद्धाच्या प्रसंगात ही सिस्टिम भारतासाठी हवाई सुरक्षा कवचाचे काम करेल. शत्रूची शक्तिशाली बॅलेस्टिक मिसाइल, फायटर विमाने हवेतच नष्ट करण्याची क्षमता या सिस्टिममध्ये आहे. जमिनीवरुन हवेत मारा करणारी लांब पल्ल्याची ही जगातील सर्वात धोकादायक मिसाइल सिस्टिम आहे.

# देशातील सर्वात श्रीमंत मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**कर्नाटकातील काँग्रेस नेते डी. के. शिवकुमार यांनी आज (३ जून) मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आहे. डी. के. शिवकुमार यांनी घोषित केलेल्या त्यांच्या मालमत्तांनुसार ते देशातील 'सर्वात श्रीमंत मुख्यमंत्री' ठरले आहेत. २०२३ च्या कर्नाटक विधानसभा निवडणुकीपूर्वी डी. के. शिवकुमार यांनी मालमत्ता घोषित केली होती.**





त्यानुसार शिवकुमार व त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांची एकूण संपत्ती १४१३.७८ कोटी रूपये असल्याचे सांगण्यात आले होते. तर २०१८ च्या कर्नाटक विधानसभा निवडणुकीपूर्वी त्यांनी त्यांची संपत्ती ८४०.०८ कोटी असल्याचे घोषित केले होते. डी.के.शिवकुमार यांचे बंधु व माजी खासदार डी.के. सुरेश यांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी आपली संपत्ती ५९३ कोटी असल्याचे शपथपत्रात सांगितले होते.

कर्नाटकातील जेडीएस पक्षाचे नेते व केंद्रीय मंत्री एच. डी. कुमारस्वामी यांनी डी. के. शिवकुमार यांच्या संपत्तीबाबत अनेकदा प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांचे आर्थिक स्त्रोत नेमके काय आहेत? असा सवाल कुमारस्वामी यांनी अनेकदा विचारला आहे. मागील अनेक वर्षांपासून शिवकुमार यांच्यावर त्यांच्या संपत्तीवरून आरोप-प्रत्यारोप होतात. संपत्तीसाठी पदाचा गैरवापर तसेच बेनामी मालमत्ता कमावल्याचा आरोप शिवकुमार यांच्यावर सातत्याने होतो. शिवकुमार यांच्यावर अनेक गुन्हे दाखल झाले आहेत. तसेच त्यांची अनेक प्रकरणे बंद झाली आहेत, तर काही प्रकरणे न्यायालयात सुरू आहेत. रोकड पाठवण्यासाठी व तिचा वापर करण्यासाठी डी.के. शिवकुमार यांनी "दिल्ली व बंगळुरू दरम्यान काही लोकांची व ठिकाणांची साखळी" तयार केल्याचा आरोप आयकर विभागाने न्यायालयात केला होता.

### २०१७ मध्ये आयकर विभागाची छापेमारी

आयकर विभागाने २०१७ मध्ये विविध ठिकाणी छापेमारी केली होती. या छापेमारीत आयकर विभागाने ८.५९ कोटींची रोकड जप्त केली होती. ही छापेमारी सुरू असतानाच डी. के. शिवकुमार यांनी गुजरातमधील काही काँग्रेस आमदारांना आश्रय दिला होता. राज्यसभेच्या निवडणुकीत घोडेबाजार होऊ नये म्हणून डी. के. शिवकुमार यांनी आमदारांना सुरक्षित स्थळी नेले होते. योगायोगाने आयकर विभागाची छापेमारी व शिवकुमार यांची आमदारांना लपवण्याची वेळ एकच होती. आयकर विभागाने जप्त केलेल्या रोख रकमेचा संबंध शिवकुमार यांच्याशी असल्याचा संशय आयकर विभागाला होता.

# आम्ही आमच्याकडून सर्वोत्तम प्रयत्न केले होते



## ‘गेल्या 10 वर्षांपासून अभिनय सोडण्याचा विचार करतोय’

दमदार अभिनयासाठी ओळखला जाणारा अभिनेता मनोज बाजपेयी यने आपल्या कारकिर्दीबाबत केलेल्या एका खुलाशामुळे चाहत्यांमध्ये आश्चर्य व्यक्त केले जात आहे. गेल्या दहा वर्षांपासून अधूनमधून अभिनय सोडण्याचा विचार मनात येत असल्याचं अभिनेत्याने म्हटले आहे. एका पॉडकास्टमध्ये बोलताना मनोज बाजपेयी म्हणाले, “खरं सांगायचं तर, गेल्या 10 वर्षांपासून मला वेळोवेळी अभिनय सोडावा असं वाटत आलं आहे. मात्र, प्रत्येक वेळी एखादी चांगली भूमिका समोर येते आणि मी पुन्हा काम स्वीकारतो. मला केवळ आर्थिक गरज म्हणून किंवा नाइलाजाने अभिनय करायचा नाही.” अभिनयाबद्दलची आपली आवड कायम असल्याचेही मनोज बाजपेयीने स्पष्ट केले. “आजही एखादं वेगळं आणि मजेदार पात्र साकारण्याची इच्छा आहे. विशेषतः एखादा व्यावसायिक चित्रपट किंवा हलकाफुलका विनोदी रोल करायला आवडेल. गाण्यांवर नाचायचं, कोणतीही मोठी तयारी न करता सेटवर जाऊन आनंदाने काम करायचं, अशीही इच्छा आहे,” असे अभिनेता म्हणाला. यावेळी अभिनेत्याने आपल्या काही गाजलेल्या चित्रपटांबद्दलही भाष्य केले. ‘अलीगढ’, ‘गली गुलियां’ आणि ‘भोसले’ यांसारख्या गंभीर भूमिकांचा मानसिक परिणाम अजूनही जाणवत असल्याचे सांगितले. “कधी कधी माझ्या मनात एक प्रकारचा अंधार जाणवतो. काही भूमिका इतक्या खोलवर मनात घर करतात की त्यांचा परिणाम मूड स्विंग्स आणि भावनिक थकव्याच्या रूपात जाणवतो.”

२०१९ मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘कलंक’ या बहुचर्चित चित्रपटाकडून प्रेक्षकांसह चित्रपटसृष्टीला मोठ्या अपेक्षा होत्या. भव्य सेट, दिग्गज कलाकार, आकर्षक संगीत आणि मोठे बजेट यामुळे चित्रपटाची जोरदार चर्चा झाली होती. मात्र, प्रदर्शित झाल्यानंतर हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर अपेक्षित यश मिळवू शकला नाही. आता या चित्रपटात बहार बेगमची भूमिका साकारणाऱ्या माधुरी दीक्षित यांनी पहिल्यांदाच या अपयशावर सविस्तर प्रतिक्रिया दिली आहे. अलीकडे एका मुलाखतीत बोलताना माधुरी दीक्षित म्हणाल्या की, कोणताही चित्रपट बनवताना कलाकार आणि संपूर्ण टीम आपले सर्वोत्तम योगदान देण्याचा प्रयत्न करत असते. मात्र, चित्रपट यशस्वी होईल की नाही, हे पूर्णपणे प्रेक्षकांच्या प्रतिसादावर अवलंबून असते. कलाकार म्हणून आपण मेहनत करू शकतो, पण अंतिम निर्णय प्रेक्षकांचाच असतो. त्यांनी सांगितले की, “मी माझ्या भूमिकेसाठी पूर्ण प्रामाणिकपणे काम केले. मला समाधान आहे की मी माझ्याकडून सर्वोत्तम प्रयत्न केले. मात्र, चित्रपटाचे भवितव्य आपल्या हातात नसते. प्रेक्षकांना तो आवडला तर तो यशस्वी होतो, अन्यथा अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही.” माधुरी यांनी असेही नमूद केले की, एखादा चित्रपट यशस्वी किंवा अयशस्वी होण्यामागे अनेक कारणे असतात. केवळ बॉक्स ऑफिसवरील कमाईवरून चित्रपटाचे मूल्यमापन करणे योग्य नाही. काही चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर लगेच यशस्वी होत नाहीत, पण कालांतराने त्यांना नव्याने प्रेक्षक मिळतात आणि त्यांचे कौतुकही केले जाते. कलंक या चित्रपटात वरुण धवन, आलिया भट्ट, आदित्य रॉय कपूर, सोनाक्षी सिन्हा, संजय दत्त आणि माधुरी दीक्षित यांसारखे मोठे कलाकार झळकले होते. चित्रपटाची दृश्यरचना, वेशभूषा आणि संगीत यांचे मोठ्या प्रमाणात कौतुक झाले. मात्र, कथानकाची मांडणी आणि संथ गती यामुळे प्रेक्षकांचा अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. यापूर्वी वरुण धवन यांनीही कलंकच्या अपयशाबाबत भावना व्यक्त केल्या होत्या. त्यांनी सांगितले होते की, चित्रपट फ्लॉप झाल्यानंतर त्यांना मोठा धक्का बसला होता. कारण संपूर्ण टीमने या चित्रपटासाठी खूप मेहनत घेतली होती. तसेच दिग्दर्शक डेव्हिड धवन यांनीही या चित्रपटाकडून मोठ्या अपेक्षा असल्याचे सांगितले होते. दरम्यान, माधुरी दीक्षित लवकरच ‘माँ बहन’ या विनोदी आणि थरारक चित्रपटात दिसणार आहेत. या चित्रपटात त्यांच्यासोबत तृप्ती डिमरी आणि रवी किशन यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. हा चित्रपट लवकरच ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार आहे.



# करिअरच्या शिखरावर असताना गुपचूप केलं लग्न



८० आणि ९० च्या दशकात आपल्या सौंदर्य, अभिनय आणि मोहक व्यक्तिमत्त्वाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारी अभिनेत्री म्हणजे जुही चावला. बॉलिवूडमध्ये यशाच्या सर्वोच्च शिखरावर असताना अचानक अभिनेत्रीने एक मोठा निर्णय घेत चाहत्यांना आश्चर्याचा धक्का दिला होता. जुही चावलाने १९८६ मध्ये ‘सुलतानत’ या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. पण तिला १९८८ मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘कयामत से कयामत तक’ चित्रपटाने ओळख मिळवून दिली. हा चित्रपट सुपरहिट ठरला आणि जुही रातोरात स्टार बनली. त्यानंतर तिला एकामागून एक चित्रपटांच्या ऑफर्स मिळाल्या. ९० च्या दशकात ती हिंदी चित्रपटसृष्टीतील आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक बनली. करिअरच्या भरभराटीच्या काळात १९९५ मध्ये जुहीने उद्योगपती जय मेहता यांच्याशी विवाह केला. जय मेहता हे तिच्यापेक्षा सात वर्षांनी मोठे आहेत. मात्र, त्या काळात अभिनेत्रींच्या लग्नाचा त्यांच्या करिअरवर परिणाम होतो, अशी धारणा होती. त्यामुळे लग्नाची बातमी सार्वजनिक झाल्यास चित्रपटांच्या संधी कमी होतील आणि करिअरला फटका बसेल, अशी भीती जुहीला वाटत होती. त्यामुळे तिने आपले लग्न अनेक वर्षे गुप्त ठेवले होते. एका मुलाखतीत जुहीने लग्न का गुप्त ठेवले होते याविषयी भाष्य केले होते. २०२० मध्ये दिलेल्या मुलाखतीत अभिनेत्रीने सांगितले होते की, “माझ्या करिअरला नुकतीच गती मिळाली होती आणि मी चांगले काम करत होते. त्याचवेळी जय माझ्या आयुष्यात आले. लग्नामुळे करिअर थांबेल अशी भीती होती, त्यामुळे मी दोन्ही गोष्टी सांभाळण्याचा मार्ग निवडला.” सध्या जुही चावला चित्रपटांपासून काहीशी दूर असली तरी संपत्तीच्या बाबतीत ती अनेक अभिनेत्रींपेक्षा खूप पुढे आहे. हुरुन रिच लिस्टनुसार, तिची एकूण संपत्ती सुमारे ७,७९० कोटी रुपये आहे. इंडियन प्रीमियर लीगमधील कोलकाता नाईट रायडर्स संघाची ती सहमालक असून, या व्यवसायातून तिला मोठे उत्पन्न मिळते. त्यामुळे जुही चावलाचा भारतातील सर्वात श्रीमंत अभिनेत्रींच्या यादीत समावेश होतो.



# माझ्याशिवाय IPL यशस्वीच झालं नसतं

## आयपीएलने फ्रँचायझी-आधारित क्रीडा स्पर्धांसाठी नवा मापदंड निर्माण केला

**महाईन्यूज** । नवी दिल्ली

**आयपीएलने जगातील सर्वात श्रीमंत क्रीडा लीगपैकी एक स्पर्धा अशी ओळख निर्माण केली आहे. या स्पर्धेने फ्रँचायझी-आधारित क्रीडा स्पर्धांसाठी नवा मापदंड निर्माण केला आहे. जगभरातील अनेक देशांनी आयपीएलच्या धर्तीवर स्वतःच्या लीग सुरू केल्या आहेत. तसेच, विविध क्रिकेट मंडळांच्या खेळाडू निवड प्रक्रियेवर आणि मोठ्या स्पर्धांसाठी प्रतिभा शोधण्याच्या पद्धतीवरही आयपीएलचा मोठा प्रभाव पडला आहे.**



आयपीएलचे संस्थापक ललित मोदींनी यादरम्यान स्पर्धेबाबत मोठं वक्तव्य केलं आहे.

ललित मोदी यांना आयपीएलचे शिल्पकार मानलं जातं. माजी भारतीय क्रिकेटपटू सबा करीम यांनी नुकताच खुलासा केला की, मोदी यांनी १९९० च्या दशकाच्या उत्तरार्धात, टी-२० क्रिकेट अस्तित्वात येण्यापूर्वीच, बीसीसीआयसमोर अशा स्पर्धेची कल्पना मांडली होती. अखेरीस २००८ मध्ये आयपीएलची सुरुवात झाली आणि ३१ मे २०२६ रोजी स्पर्धेचा १९वा हंगाम संपन्न झाला. आज या लीगची किंमत अभूतपूर्व पातळीवर पोहोचली आहे.

'द स्कूप एक्स्टेंडेड' या कार्यक्रमात ललित मोदी यांनी आपल्या आयपीएलमधील योगदानाचं समर्थन केलं. आयपीएल त्यांच्या शिवाय यशस्वी होऊच शकली नसती, असा दावा त्यांनी केला. तसेच, गेल्या अनेक वर्षांपासून टीका होत असूनही, आपण घेतलेल्या कोणत्याही निर्णयाकडे चूक म्हणून पाहत नसल्याचंही त्यांनी ठामपणे सांगितलं.

ललित मोदी यांनी आयपीएलमधील आपल्या भूमिकेचे समर्थन करताना म्हणाले, "इतर अनेक कारणांमुळे मला टार्गेट करण्यात आलं. प्रत्येकजण माझ्यावर जळत होता. मी जसा होतो, तसा नसतो तर हे यश शक्यच झालं नसतं. माझ्याशिवाय आयपीएल स्पर्धा यशस्वी झालीच नसती. मी १७ वर्षांपासून या स्पर्धेचा भाग नाही, तरी आज तुम्ही माझी मुलाखत का घेत आहात? आयपीएलची कल्पना काही अचानक सुचलेली नव्हती. त्यामागे भरपूर वैज्ञानिक संशोधन आणि माझे अनेक अनुभव होते. जगभरातील अनेकांनी मी निर्माण केलेली गोष्ट उभी करण्याचा प्रयत्न केला, पण ते अपयशी ठरले."

आपल्या निर्णयांबाबत बोलताना मोदी यांनी ठाम भूमिका घेतली, "लोक म्हणतात की मी चुका केल्या, पण माझ्या मते मी कोणतीही चूक केलेली नाही. जर मला पुन्हा एकदा हे सर्व करण्याची संधी मिळाली, तर मी मागच्या वेळी जे केलं होतं त्यात काहीही बदल करणार नाही."

### २०११ नंतर आयपीएल अध्यक्षपदाची जबाबदारी

दरम्यान, २०११ नंतर आयपीएल अध्यक्षपदाची जबाबदारी चिरायू अमीन, राजीव शुक्ला, रंजीव बिस्वाल, बृजेश पटेल आणि अरुण सिंह धुमाळ यांनी सांभाळली आहे. धुमाळ २०२२ पासून या पदावर कार्यरत आहेत.

### देश सोडताना काही महत्त्वाच्या गोष्टी अपूर्ण राहिल्या

ललित मोदी यांनी कबूल केलं की, भारत सोडताना काही महत्त्वाच्या गोष्टी अपूर्ण राहिल्याची खंत त्यांना आजही वाटते, "भारत सोडताना काही गोष्टी पूर्ण करता आल्या नाहीत, याची मला खंत आहे. आयपीएलच्या संस्थापकाला नेहमीच लीगच्या बोर्डावर एक जागा मिळायला हवी होती. मी बीसीसीआयला खूप जास्त अधिकार दिले. त्या काळात मी माझ्या अटी ठामपणे मांडू शकलो असतो, कारण बहुतेकांना वाटत होतं की आयपीएल अपयशी ठरेल. त्यामुळे त्यांना या प्रकल्पाची फारशी पर्वा नव्हती. मी स्वतंत्र कंपनी स्थापन करण्यासाठी संविधानही तयार केले होते." ललित मोदी यांच्या मते, बीसीसीआयला आर्थिक लाभ मिळत राहायला हवा होता, मात्र लीगचे प्रशासन हे फ्रँचायझी मालक आणि बीसीसीआय यांच्या संयुक्त भागीदारीत चालवलं गेलं पाहिजे होतं, "बीसीसीआयला उत्पन्न मिळत राहिले असते, पण लीगचे प्रशासन आयपीएल फ्रँचायझी मालक आणि बीसीसीआय यांच्या भागीदारीत असायला हवे होते."

# सूर्यकुमार यादवची T20 कर्णधारपदावरून उचलबांगडी; संघातूनही डच्चू!

**महाईन्यूज** । नवी दिल्ली

**भारतीय क्रिकेट क्षेत्रातून सध्या अत्यंत खळबळजनक वृत्त समोर येत आहे. भारताला आपल्या नेतृत्वाखाली टी-२० विश्वचषक जिंकून देणारा स्टार फलंदाज सूर्यकुमार यादव याला टी-२० संघाच्या कर्णधारपदावरून तडकाफडकी हटवण्यात आले आहे. एवढेच नव्हे तर, फॉर्मशी झगडत असलेल्या सूर्याला आगामी मालिकांसाठी भारतीय संघात स्थान मिळणेही कठीण झाले आहे.**




भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (BCCI), निवड समिती आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी भविष्यातील विजन डोळ्यांसमोर ठेवून हा अत्यंत कठोर आणि मोठा निर्णय घेतला आहे.

या महिन्याच्या अखेरीस होणाऱ्या आयर्लंड आणि इंग्लंडच्या आगामी दौऱ्यांपूर्वीच बीसीसीआयने हा मोठा निर्णय जाहीर केला असून, भारतीय संघ आता एका नव्या कर्णधाराच्या नेतृत्वाखाली मैदानात उतरण्यासाठी सज्ज होत आहे.

बीसीसीआयच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने 'द इंडियन एक्सप्रेस'शी बोलताना या वृत्ताला दुजोरा दिला आहे. अधिकाऱ्याने स्पष्ट केले की, निवड समिती, बोर्ड आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्यात झालेल्या प्रदीर्घ चर्चेनंतर हा निर्णय घेण्यात आला.

"सूर्यकुमार यादवच्या कप्तानीखाली संघाने टी-२० विश्वचषकाचे विजेतेपद नक्कीच पटकावले. तसेच त्याच्या नेतृत्वाखाली संघाने सलग आठ द्विपक्षीय मालिका आणि २०२५ चे आशिया चषक देखील जिंकले. परंतु, त्याचा सध्याचा फॉर्म आणि संघाचे भविष्य पाहता, आता पुढे जाण्याची आणि नवीन पर्याय शोधण्याची हीच योग्य वेळ आहे, असे मॅनेजमेंटला वाटते. त्याला आगामी निवडसाठी विचारात घेतले जाणार नाही आणि या निर्णयाची कल्पना लवकरच सूर्याला दिली जाईल," असे या अधिकाऱ्याने सांगितले.

या हंगामातील १३ सामन्यांत त्याला केवळ २७० धावा करता आल्या. हंगामातील शेवटच्या सामन्यात राजस्थान रॉयल्सविरुद्ध त्याने अर्धशतक झळकावून पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला, परंतु संपूर्ण हंगामात तो धावांसाठी संघर्ष करतानाच दिसला. परिणामी, टी-२० फॉरमॅटमधील भारताच्या एका सर्वोत्तम फलंदाजाचा हा प्रवास आता थांबण्याच्या मार्गावर आहे. या निर्णयामुळे भारतीय टी-२० संघात नव्या नेतृत्वाची सुरुवात होणार असून, आगामी विश्वचषकाच्या दृष्टीने संघबांधणीला वेग मिळणार आहे.

### आयपीएल २०२६ मधील निराशाजनक कामगिरी

२०२४ मध्ये रोहित शर्मने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून संन्यास घेतल्यानंतर, हार्दिक पांड्याला मागे टाकत सूर्यकुमार यादवकडे भारतीय टी-२० संघाची धुरा सोपवण्यात आली होती. त्यावेळी तो जगातील अव्वल क्रमांकाचा फलंदाज होता. मात्र, कर्णधारपद आल्यानंतर त्याच्या फलंदाजीचा आलेख खालावला. गेल्या काही काळापासून त्याच्या बॅटमधून धावा निघत नव्हत्या. नुकत्याच संपलेल्या आयपीएल २०२६ च्या हंगामातही त्याचा फॉर्म अत्यंत चिंताजनक होता.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। गुरुवार ।

दि. 04 जून 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# खराबवाडीत अवैध गॅस रिफिलिंग अड्ड्यावर छापा

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

घरगुती एलपीजी गॅसचा अवैध साठा करून रिफिलिंग व विक्री करणाऱ्या अड्ड्यावर गुन्हे शाखेच्या मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाने छापा टाकत ८१ गॅस सिलिंडर जप्त केले. या कारवाईत एक लाख ३०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून एकाला अटक करण्यात आली आहे.

सचिन प्रकाश म्हस्करे (वय ३१, रा. खराबवाडी, ता. खेड) याला अटक करण्यात आली असून एका १६ वर्षीय विधी संघर्षित बालकाला ताब्यात घेण्यात आले आहे. उत्तर महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खराबवाडी परिसरात ही कारवाई करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी घरगुती गॅस सिलिंडरचा अवैध साठा करून त्याचे रिफिलिंग व विक्री करत होते. छाप्यात ८१ सिलिंडर जप्त करण्यात आले. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता, जीवनावश्यक वस्तू अधिनियम तसेच स्फोटक पदार्थ अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. अवैध गॅस रिफिलिंगमुळे आग, स्फोट आणि जीवितहानीचा धोका निर्माण होऊ शकत असल्याने ही कारवाई संभाव्य अनर्थ टाळणारी ठरल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

## मोठी दुर्घटना टळली!

अवैध गॅस रिफिलिंग हा केवळ आर्थिक गुन्हा नसून सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक प्रकार आहे. कोणतीही सुरक्षा व्यवस्था न पाळता सिलिंडरमधून गॅस भरला जात असल्याने गळती, आग किंवा स्फोट होण्याची शक्यता असते. खराबवाडीसारख्या औद्योगिक व रहिवासी भागात सुरू असलेल्या या व्यवसायावर कारवाई झाल्याने संभाव्य मोठी दुर्घटना टळल्याचे मानले जात आहे.




"जीवनावश्यक वस्तूंची साठेबाजी, काळाबाजार आणि नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित अवैध व्यवसायांविरोधात गुन्हे शाखेच्या माध्यमातून सातत्याने कारवाया सुरू आहेत. अशा प्रकारे अवैध गॅस रिफिलिंग करून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल."

- संजय चव्हाण, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मालमत्ता गुन्हे विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी-चिंचवड

D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026



*DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.*
*It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.*

**UG/PG Programs**

- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp

2025 Excellence in Chemical Engineering for a Sustainable Future
2025 Bright Blue Print in Civil Engineering Education
2025 Creative Excellence in Film Studies & Media Research
2024 Excellence in Digital Disruption
2024 Most Promising Engineering University in India
2024 Game Changer in Bioengineering Education
2024 Trailblazer in Semiconductor Engineering

CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# भाजपाच्या आढावा बैठकीत 'रणनीती'!

## मोदी सरकारच्या कल्याणकारी योजना घराघरांत पोहचवण्याचा संकल्प

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**भारतीय जनता पार्टीच्या पश्चिम महाराष्ट्र विभागाच्या वतीने पिंपरी-चिंचवड, पुणे उत्तर आणि मावळ जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची विभागीय आढावा बैठक बुधवारी उत्साहात पार पडली. आगामी संघटनात्मक कार्यक्रम, केंद्र व राज्य सरकारच्या कल्याणकारी योजनांचा जनतेपर्यंत प्रभावी प्रचार आणि पक्ष संघटन बळकटीकरणाच्या दृष्टीने या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.**




> "पिंपरी-चिंचवड भाजप संघटनात्मकदृष्ट्या अधिक सक्षम करण्यासाठी आम्ही प्रत्येक प्रभाग आणि मंडल स्तरावर नियोजनबद्ध पद्धतीने काम करत आहोत. पर्यावरण संवर्धन, योग दिन, आणीबाणी जनजागृती आणि केंद्र सरकारच्या लोककल्याणकारी योजनांचा लाभ प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविण्याचा आमचा निर्धार आहे. कार्यकर्त्यांच्या अथक परिश्रमाच्या बळावर सर्व अभियानांची शंभर टक्के यशस्वी अंमलबजावणी करून पिंपरी-चिंचवड राज्यात पुन्हा एकदा आदर्श निर्माण करेल, असा मला पूर्ण विश्वास आहे."
>
> – शत्रुघ्न (बापू) काटे, अध्यक्ष, भाजप पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा.

बैठकीस भाजप महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस व विभाग समन्वयक आमदार निरंजन डावखरे, प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर, विभाग सहसंयोजक विक्रम देशमुख, अभियान प्रदेश सहसंयोजक विक्रम पाचपुते आणि जिल्हा प्रभारी भरत पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. पिंपरी-चिंचवड शहर जिल्हाध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे आणि पुणे उत्तर (मावळ) जिल्हाध्यक्ष प्रदीप कंद यांनी स्वागताध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळली.

'मोदी सरकारची यशस्वी वर्षे : विश्वास, विकास आणि जनकल्याण' या राज्यव्यापी महाअभियानांतर्गत पिंपरी-चिंचवड जिल्ह्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या चार प्रमुख कार्यक्रमांच्या अंमलबजावणीवर बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

यामध्ये ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शहरात एका दिवसात किमान १५ हजार वृक्षांची लागवड करण्याचे नियोजन करण्यात आले असून, संपूर्ण आठवड्यात एक लाखांहून अधिक वृक्ष लागवड व संवर्धनाचा संकल्प करण्यात आला आहे. तसेच २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन शहरातील विविध योग संस्था, पतंजली परिवार आणि नागरिकांच्या सहभागातून मोठ्या प्रमाणावर साजरा करण्याचे ठरविण्यात आले.

याशिवाय २५ जून रोजी आणीबाणीच्या ५१व्या वर्षानिमित्त मंडल स्तरावर विशेष कार्यक्रम आयोजित करून त्या काळात तुरुंगवास भोगलेल्या मिसाबंदींचा सत्कार करण्यात येणार आहे. आणीबाणीच्या काळातील घटनांवर व्याख्याने आणि जनजागृती कार्यक्रमही राबविले जाणार आहेत. केंद्र सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी शहरातील विविध मंडलांमध्ये प्रदर्शने आयोजित करण्यात येणार असून, विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा तसेच लाभार्थ्यांच्या प्रतिक्रिया व्हिडिओ स्वरूपात प्रसारित करण्याचेही नियोजन करण्यात आले आहे.

बैठकीत पक्षाच्या 'एसआयआर' (SIR) नोंदणी अभियानाचाही आढावा घेण्यात आला. भोसरी, चिंचवड आणि पिंपरी विधानसभा मतदारसंघांमध्ये सुरू असलेल्या या मोहिमेत आतापर्यंत सुमारे ४० टक्के नोंदणी पूर्ण झाल्याची माहिती शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी दिली. पुढील १५ दिवसांत हा आकडा ५० टक्क्यांहून अधिक होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी मार्गदर्शन करताना प्रदेश सरचिटणीस आमदार निरंजन डावखरे यांनी पिंपरी-चिंचवड भाजपच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले. राष्ट्रीय व प्रादेशिक स्तरावरील उपक्रम प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्यात पिंपरी-चिंचवड शहर नेहमीच राज्यात आघाडीवर राहिले असून, आगामी कार्यक्रमांचे नियोजन आणि एसआयआर नोंदणीतील प्रगती समाधानकारक असल्याचे त्यांनी सांगितले. बैठकीस आमदार महेश लांडगे, आमदार शंकरशेठ जगताप, माजी खासदार अमर साबळे, खासदार रणजितसिंह निंबाळकर, माजी आमदार अश्विनी जगताप, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांच्यासह पश्चिम महाराष्ट्र व मावळ परिसरातील पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, मंडल अध्यक्ष आणि भाजप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीचे सूत्रसंचालन योगेश बाचल यांनी केले, तर जिल्हा महामंत्री मधुकर बच्चे यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने बैठकीची सांगता झाली.

# पिंपरी चिंचवड महापालिकेत विविध अधिकाऱ्यांना अतिरिक्त कार्यभाराचे वाटप

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने प्रशासकीय कामकाजात अधिक सुसूत्रता, समन्वय आणि कार्यक्षमता राखण्याच्या दृष्टीने विविध विभागांतील अधिकाऱ्यांना अतिरिक्त कार्यभाराची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.**



### सेवा वितरणाची गुणवत्ता वाढविण्यावरही भर

विविध क्षेत्रीय कार्यालयांमधील सेवा वितरणाची गुणवत्ता वाढविण्यावरही भर देण्यात येणार आहे. विभागीय स्तरावरील निर्णय प्रक्रियेला अधिक गती मिळावी, हा देखील या कार्यभार वाटपामागील उद्देश असल्याचे समजते. आगामी काळात प्रशासकीय यंत्रणा अधिक परिणामकारक आणि उत्तरदायी बनविण्यासाठी अशा स्वरूपाचे बदल सुरू राहण्याची शक्यता आहे.

महानगरपालिकेच्या अभिलेख कक्षाच्या प्रशासन अधिकारी उमा दरवेश यांच्याकडे स्थानिक संस्था कर विभागाच्या सहाय्यक आयुक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. तसेच सामान्य प्रशासन विभागाचे प्रशासन अधिकारी गोरखनाथ लिमण यांच्याकडे ब क्षेत्रीय कार्यालयाच्या क्षेत्रीय अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे.

याशिवाय सामान्य प्रशासन विभागाचे कार्यालय अधीक्षक दत्ता सूर्यवंशी यांच्याकडे क्रीडा विभागाच्या प्रशासन अधिकारी पदाचा तर स्थानिक संस्था कर विभागाच्या कार्यालय अधीक्षक सरिता मारणे यांच्याकडे फ क्षेत्रीय कार्यालयाच्या प्रशासन अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या स्वाक्षरीने याबाबतचे स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

महानगरपालिकेच्या विविध विभागांतील कामकाज सुरळीत, गतिमान आणि परिणामकारक पद्धतीने पार पाडण्यासाठी हे अतिरिक्त कार्यभार वाटप करण्यात आले असून, त्यामुळे प्रशासकीय कार्यक्षमता वाढण्यास आणि नागरिकांना अधिक प्रभावी सेवा देण्यास मदत होणार आहे.

या बदलांमुळे विविध विभागांमधील समन्वय अधिक सक्षम होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. अतिरिक्त जबाबदाऱ्या स्वीकारणाऱ्या अधिकाऱ्यांना त्यांच्या अनुभवाचा आणि प्रशासकीय कौशल्याचा लाभ संबंधित विभागांना मिळणार आहे. नागरिकांच्या दैनंदिन कामकाजाशी निगडित प्रकरणांचा निपटारा अधिक वेगाने होण्यासाठीही या निर्णयाचा फायदा होणार आहे. प्रलंबित विषयांवर तत्काळ कार्यवाही करण्यासाठी प्रशासनाने ही पावले उचलल्याचे सांगितले जात आहे.

# एमआयडीसीतून सिलिंडरचा बेकायदा साठा जप्त

## एक लाख ३०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**घरगुती गॅस सिलिंडर वेळेत मिळत नसल्याच्या तक्रारी नागरिकांकडून सातत्याने केल्या जात असताना उत्तर महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध गॅस रिफिलिंगचा प्रकार उघडकीस आला आहे.**




गुन्हे शाखेच्या मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाने खराबवाडी येथे छापा टाकून तब्बल ८१ गॅस सिलिंडर जप्त केले. या कारवाईत एक लाख ३०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून एका आरोपीसह एका विधी संघर्षित बालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सचिन प्रकाश म्हस्करे (३१, रा. खराबवाडी, ता. खेड, जि. पुणे) याला अटक करून एका १६ वर्षीय विधी संघर्षित बालकाला ताब्यात घेण्यात आले आहे.

पोलिस उपायुक्त रोहिदास पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, उत्तर महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जय गणेश भारत गॅस कार्यालयासमोरील, हनुमान मंदिराच्या विरुद्ध बाजूस असलेल्या खराबवाडी परिसरात छापा टाकण्यात आला.

यावेळी आरोपी सचिन म्हस्करे आणि एका १६ वर्षीय विधी संघर्षित बालकाच्या ताब्यातून ८१ गॅस सिलिंडर जप्त करण्यात आले. आरोपींनी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी अवैधरित्या गॅस रिफिलिंग करून विक्रीसाठी हा साठा करून ठेवल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.

या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम २८७, २८८, जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ चे कलम ३ व ७ तसेच स्फोटक पदार्थ अधिनियम १९०८ च्या कलम ५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींना वैद्यकीय तपासणी करून पुढील तपासासाठी उत्तर महाळुंगे एमआयडीसी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. घरगुती एलपीजी गॅस हा सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेला जीवनावश्यक घटक मानला जातो. अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणात सिलिंडरचा अवैध साठा करून त्याचे रिफिलिंग व विक्री केली जात असल्याचे समोर आल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

"जीवनावश्यक वस्तूंची साठेबाजी, काळाबाजार आणि नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित अवैध व्यवसायांविरोधात गुन्हे शाखेच्या माध्यमातून सातत्याने कारवाया सुरू आहेत. अशा प्रकारे अवैध गॅस रिफिलिंग करून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल."

**- संजय चव्हाण, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मालमत्ता गुन्हे विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी-चिंचवड.**

### खराबवाडीसारख्या भागालगत व्यवसाय सुरू

अवैध गॅस रिफिलिंग हा केवळ आर्थिक गुन्हा नसून सुरक्षेच्या दृष्टीनेही अत्यंत गंभीर प्रकार मानला जातो. कोणतीही सुरक्षा यंत्रणा किंवा तांत्रिक मानके न पाळता सिलिंडरमधून गॅस भरला जात असल्यास गळती, आग अथवा स्फोटाचा धोका निर्माण होऊ शकतो. खराबवाडीसारख्या औद्योगिक आणि रहिवासी भागालगत अशा प्रकारचा व्यवसाय सुरू असल्याने मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती. त्यामुळे पोलिसांनी केलेली ही कारवाई संभाव्य अनर्थ टाळणारी ठरल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. मालमत्ता गुन्हे विरोधी पथकातील पोलीस अंमलदार गणेश सावंत आणि विनोद वीर यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग देवकाते, गोरक्षनाथ बालवडकर, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक महेश खांडे तसेच पोलीस अंमलदार नितीन लोखंडे, गणेश कोकणे, अमर कदम, विनोद वीर, गणेश सावंत आणि विशाल गायकवाड यांनी संयुक्तरीत्या ही कारवाई केली.

# रातोरात आयटी कंपनी बंद करणे मालकाला अखेर पडले महागात!

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्कमधील थिंकटेक इंडिया आयटी कंपनीने रातोरात कार्यालय बंद करून गाशा गुंडाळल्याचा प्रकार समोर आला होता. यामुळे कंपनीत काम करणारे सातशे आयटी अभियंते रस्त्यावर आले. हा निर्णय कंपनीच्या मुख्याधिकाऱ्याला आता महागात पडला आहे. पोलिसांनी त्याच्यावर कारवाई करून त्याच्या मुसक्या आवळल्या.**



### नेमका प्रकार काय?

कंपनीकडून दर महिन्याच्या ७ अथवा ८ तारखेला कर्मचाऱ्यांच्या खात्यात वेतन जमा होत असे. मात्र, वेतन उशिरा होण्यास सुरूवात झाली. नंतर महिना उलटूनही वेतन मिळत नसल्याचे प्रकार घडू लागले. यामुळे कर्मचाऱ्यांनी कंपनीच्या व्यवस्थापनाला याबद्दल जाब विचारला. कंपनीच्या मुख्याधिकाऱ्यांकडे धाव घेऊन कर्मचाऱ्यांनी याबाबत विचारणा केली. त्यावेळी कंपनीचे अंतर्गत लेखापरीक्षण सुरू आहे, असे कारण त्यांना देण्यात आले. याचबरोबर थकीत वेतन लवकरच देण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले. त्यानंतर कंपनीने अचानक एका रात्री कार्यालय बंद केले.

या प्रकरणी फसवणुकीची तक्रार या कंपनीतील कर्मचाऱ्यांनी हिंजवडी पोलीस ठाण्यात दिली आहे. या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी कंपनीचा मुख्याधिकारी हर्षल ठाकरे यांनी बुधवारी अटक केली. आतापर्यंत सुमारे ३० कर्मचाऱ्यांनी पोलिसांकडे तक्रार केली आहे. आणखी कर्मचारी तक्रारी करीत असून, ही संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे. पोलिसांनी मनुष्यबळ प्रमुख आणि व्यवस्थापकावरही गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी आणखी कोणाचा समावेश होता का, याचा तपास पोलीस करीत आहेत.

हिंजवडी आयटी पार्कमधील टप्पा क्रमांक दोनमध्ये या कंपनीचे कार्यालय होते. कंपनीने गेल्या वर्षी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ भरती केली. कंपनीने गेल्या वर्षभरात शेकडो अभियंत्यांना नोकरी दिली. त्यात प्रामुख्याने नवीन आणि प्रशिक्षणार्थी उमेदवारांचा समावेश होता. या उमेदवारांना सुरूवातीच्या काळात दरमहा १५ हजार रुपयांचे मानधनरुपी वेतन देण्यात आले. काही महिने कंपनीचे कामकाज सुरळीतपणे सुरू होते. त्यानंतर यंदा फेब्रुवारी महिन्यापासून परिस्थिती बदलण्यास सुरूवात झाली. कर्मचाऱ्यांच्या वेतनाला तेव्हापासून विलंब सुरू झाला. या प्रकरणी कर्मचाऱ्यांनी ‘फोरम फॉर आयटी एम्प्लॉईज’ या संघटनेकडे गाऱ्हाणे मांडले होते. त्यानंतर फोरमच्या पुढाकाराने या कर्मचाऱ्यांनी पोलिसांकडे तक्रार केली.

थिंकटेक इंडियातील प्रकाराची दखल कामगार आयुक्तालयाने घेतली आहे. या प्रकरणी तपासणीसाठी कामगार विभागाचे पथक गेले होते. परंतु, कंपनीचे कार्यालय बंद असल्याचे आढळले. या प्रकरणी कंपनीकडे खुलासा मागविण्यात येणार आहे. कंपनीतील कर्मचाऱ्यांनी अद्याप कामगार आयुक्तालयाकडे तक्रार दाखल केलेली नाही.

**PRIYADARSHANI SCHOOL & JR. COLLEGE**
MOSHI



# 43 YEARS OF NURTURING VALUES, EXCELLENCE AND TOMORROW'S LEADERS.

# ADMISSIONS OPEN 2026-27

Nursery to Grade 5

## WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?

43 Years of Excellence in Education | Advanced Robotics & Computer Labs Experienced and Dedicated Faculty | Multiple Sports Grounds for All-Round Development Proven 100% Results in Grade X | A Perfect Blend of Tradition and Innovation

+91 9890613333 | +91 9373073077

pgosm05@gmail.com www.priyadarshanischoolmoshi.in